## आय विटनेस भुयारी मेट्रो ३ : कफ परेड स्टेशन चकाचक







■ कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. या कामाच्या प्रगतीमध्ये आता दिवसेंदिवस आणखी भर पडत आहे. या प्रकल्पांतील स्थानकांच्या कामांच्या प्रगतीचा आढावा सातत्याने अधिकाऱ्यांकडून घेतला जात असून, काळबादेवी, गिरगाव, हुतात्मा चौक आणि कफ परेड या स्थानकांच्या कामांचा आढावा नुकतेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतला आहे.

■ भुयारी मेट्रो-३ चे काम मात्र सुसाट वेगाने सुरू असून, भुयारी काम बऱ्यापैकी पूर्ण झाले आहे. या व्यतिरिक्त स्थानकांच्या कामांसह विद्युतीकरण आणि इतर कामां-चादेखील धडाका सुरु असून, सरकत्या जिन्यांच्या कामांनीदेखील वेग पकडला आहे.

■ आंध्र प्रदेश येथील श्रीसिटीमध्ये म्हणजे जेथे मेट्रोचे कोच तयार केले जातात तेथे मेट्रो-३साठीच्या पहिल्या मेट्रोची टेस्ट ट्रायल होत आहेत. भुयारी मेट्रो-३च्या डब्यांची मरोळ मरोशी येथे चाचणी करण्यात येणार असून, ट्रेन मुंबईत दाखल होताच चाचण्यांना सुरुवात होणार आहे. आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता मेट्रोच्या चाचण्या पूर्ण करण्यात येणार आहेत. त्याचा निश्चितच लाभ मुंबईकरांना होणार आहे.

# मेट्रो : प्रकाश योजनेचे काम वेगाने करण्याच्या सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रोचे काम वेगाने करण्यात येत असून, आजघडीला मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ कडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारण या दोन्ही मेट्रोचे मार्ग पूर्णत्वाकडे आले असून, एमएमआरडीएचे आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास प्रकल्पाच्या कामांची सातत्याने पाहणी करत आहेत.

नुकेतच श्रीनिवास यांनी मेट्रो २ अ आणि संबंधित समस्यांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, स्थानिकांवरील कामांची पाहणीदेखील केली.

या कामांची पाहणी केल्यानंतर स्थानकांच्या सुरू असलेल्या छतांच्या कामांसोबतच आंतररचना आणि प्रकाश योजनेचे काम वेगाने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवाय आयुक्तांनी दूरसंचार समस्यांसोबत सिग्नलिंग यंत्रणेचीदेखील माहिती घेतली. सर्व यंत्रणा आणि सुरक्षा चाचण्या सुयोग्य पध्दतीने पार पडत असल्याची खात्री करून घेण्याच्या सूचना केल्या.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने मुंबईच्या पश्चिम उपनगरात मेट्रो- २ अ आणि मेट्रो- ७ चे काम करण्यात येत आहे.

या दोन्ही मेट्रो नव्या वर्षात म्हणजे जानेवारी-फेब्रुवारी २०२२ मध्ये रुळावर येणार आहेत. मेट्रो- २ अ ही (यलो लाइन) तर मेट्रो- ७ ही (रेड लाइन) म्हणून ओळखली जात आहे.

या दोन्ही मेट्रो रुळावर आल्यानंतर पश्चिम उपनगरात वास्तव्य करत असलेल्या नागरिकांचा प्रवास वेगवान होणार आहे. रस्त्यावर वाहतूककोंडीही होणार नाही.